# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018

## वैद्यकीय विभाग

Email – medical@pcmcindia.gov.in
Website –www.pcmcindia.gov.in

### -:जाहिर निवेदन क्र. १।२०१९-२०

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत एकूण १० धार्मिक (मुस्लिम-८, ख्रिश्चन-१ व लिंगायत-१) दफनभूमीच्या ठिकाणी व परिसराची २४ तास देखभाल करणे, दैनंदिन साफसफाई व स्वच्छता राखणे, म.न.पा. मालमतेची सुरक्षा राखणे, स्मशान पास जमा करुन त्यांची रजिस्टरला नोंद करणे व त्या अनुषंगाने इतर सोपविलेली कामे पुर्ण करणेकामी ८ तासासाठी १ याप्रमाणे दररोज ३ काळजीवाहक ३ वर्षासाठी पुरविणेकामी सदर जाहिर निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येते की,

इच्छूक नोंदणीकृत धर्मादाय संस्थांनी त्यांच्या धर्माच्या दफनभूमीसाठीच मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ यांचे नांवे अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रांचे सत्यप्रती जोडून वैद्यकीय मुख्य कार्यालय, २ रा मजला, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ दिनांक- ९/७/२०१९ ते दिनांक-१५/७/२०१९ या कालावधीत सादर करावेत.

याबाबत कोणतीही माहिती आवश्यक असल्यास वैद्यकीय मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता अर्ज/प्रस्ताव पुर्णतः अथवा अशंतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८ यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. सदरचे जाहिर निवेदन, कामासंबधी अटी-शर्ती, धार्मिक दफनभूमींचे पते व यादी इ.www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-४११ ०१८

जाहिरात क्रमांक – ३२२
जा.क्रं. वैद्य/७/कावि/१२०३/२०१९
दिनांक - २८/०६/२०१९

अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी- चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-४११ ०१८

# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018

## वैद्यकीय विभाग

Email – medical@pcmcindia.gov.in Website –www.pcmcindia.gov.in

## जाहिर निवेदन क्रं.१/२०१९-२०

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सद्यस्थितीत एकूण १० धार्मिक (मुस्लिम-८, ख्रिश्चन-१ व लिंगायत-१) दफनभूमीच्या ठिकाणी व परिसराची २४ तास देखभाल करणे, दैनंदिन साफसफाई व स्वच्छता राखणे, म.न.पा. मालमतेची सुरक्षा राखणे, स्मशान पास जमा करुन त्यांची रजिस्टरला नोंद करणे व त्या अनुषंगाने इतर सोपविलेली कामे पुर्ण करणेकामी ८ तासासाठी १ याप्रमाणे दररोज ३ काळजीवाहक ३ वर्षासाठी पुरविणेकामी सदर जाहिर निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येते की, इच्छूक नोंदणीकृत धर्मादाय संस्थांनी त्यांच्या धर्माच्या दफनभूमीसाठीच मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ यांचे नांवे अर्ज व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे सत्यप्रती करुन जोडून वैद्यकीय मुख्य कार्यालय, २ रा मजला, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ दिनांक- ०७/१०/२०१९ ते दिनांक- १५/१०/२०१९ या कालावधीत सादर करावेत.

याबाबत कोणतीही माहिती आवश्यक असल्यास वैद्यकीय मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. कोणतेही कारण न देता अर्ज/प्रस्ताव पुर्णतः अथवा अशंतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८ यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. सदरचे जाहिर निवेदन, कामासंबंधी अटी-शर्ती, धार्मिक दफनभूमींचे पत्ते व यादी इ.www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे –

१) सदर कामासाठी किमान वेतन कायदा व भविष्य निर्वाह निधी कायदा लागू राहील.

२) एखाद्या धार्मिक दफनभूमीसाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, कामाचा अनुभव असणा-या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.याबाबत वाद निर्माण झाल्यास सोडत/लॉटरी पध्दतीने काम देण्यात येईल.

३) एका संस्थेस एकाच दफनभूमीसाठी अर्ज करता येईल.

४) या कामी अर्ज सादर करणा-या इच्छूक धार्मिक संस्थांनी त्यांच्या धर्माच्या दफनभूमीसाठीच अर्ज करावे. (उदा. मुस्लिम संस्थांनी मुस्लिम दफनभूमीसाठी तसेच ख्रिश्चन संस्थांनी ख्रिश्चन दफनभूमीसाठीच अर्ज करावेत)

५) सदर कामासाठी किमान वेतन दराप्रमाणे ५ % सेवा शुल्क देय राहील.

६) एखाद्या धार्मिक दफनभूमीकरिता अर्ज प्राप्त न झाल्यास, त्या धार्मिक दफनभूमीसाठी त्या धर्माच्या प्राप्त अर्जातील इतर संस्थेचा विचार करण्यात येईल.

७) खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे (सत्यप्रत केलेले) सादर करणे बंधनकारक राहील. -

अ) धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र

ब) पी. एफ. रजिस्ट्रेशन व पी.एफ. भरल्याचे अद्ययावत चलन

क) मागील ३ वर्षाचे (सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९) मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील ताळेबंद अहवाल

ड) पॅन कार्ड व मागील ३ वर्षातील आयकर रिटर्न भरलेचा पुरावा

इ) कामाचा अनुभव असल्यास दाखला/कामाचा आदेश/करारनामा यापैकी कोणतेही १ प्रत

संबंधीत अर्जदार संस्थांनी उपरोक्त प्रमाणे आवश्यक ती अद्ययावत कागदपत्रे सत्यप्रत करुन अर्ज सादर करणेच्या अंतिम तारखेपर्यंत (दिनांक-१५/१०/२०१९) मा.आयुक्त, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८ यांचे नांवे वैद्यकीय मुख्य कार्यालय, २ मजला येथे कार्यालयीन वेळेत सादर करावीत. विहीत मुदतीत अर्ज व कागदपत्रे सादर न केल्यास, अपुर्ण कागदपत्रे सादर केल्याने अर्ज अपात्र झाल्यास, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. मुदतीनंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत तसेच याबाबत कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही.

८) शासनाकडून वेळोवेळी निश्चित केलेले कर नियुक्त धार्मिक संस्थेस भरावे लागतील. सदर कामासाठी वस्तू व सेवाकर देय नाही.

९) ज्या धार्मिक दफनभूमीसाठी अर्ज सादर करावयाचा आहे, त्या धार्मिक दफनभूमीसभेट देऊन परिसर, कामाचा तपशील पाहून, मान्य असल्यासच अर्ज सादर करण्यात यावे. त्यानंतर अर्ज सादर केलेल्या संस्थाच्या अडचणींचा विचार केला जाणार नाही.

१०) कामाचे बिल दरमहा अदा केले जाईल. तथापी किमान ३ महिन्याचे पुर्ण वेतन कार्यरत कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना अदा करण्याची क्षमता संबंधीस धार्मिक संस्थांची असणे बंधनकारक राहील. संबंधीत कामावर नियंत्रण ठेवणेसाठी ज्या त्या क्षेत्रीय कार्यालयातील किटकनाशक विभागाचे आरोग्य निरीक्षक, मलेरिया इन्स्पेक्टर यांचे पर्यवेक्षिय नियंत्रण राहील. क्षेत्रीय कार्यालयातील किटकनाशक विभागाचे आरोग्य निरीक्षक, मलेरिया इन्स्पेक्टर यांनी दैनंदिन साफसफाईचे तसेच देखभालीचे काम समाधानकारक पार पाडल्याचा अहवाल दिल्यानंतरच बिल अदा केले जाईल.

११) नियुक्त धार्मिक संस्थेस किमान वेतन कायदयातील तरतुदींची पुर्तता करावी लागेल. याबाबत काही कायदेशीर बाबी उपस्थित झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त धार्मिक संस्थेची राहील.

अ) या कामासाठी नियुक्त कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना साप्ताहिक सुट्टी देय राहील.

ब) याकामी नियुक्त कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना कामगार कायद्यानुसार आदेशानंतर १५ दिवसात देय असलेल्या सुविधा उदा. गणवेश, ओळखपत्र, बूट इ. व सुरक्षा साधने उदा. ग्लोज, मास्क इ. ३ दिवसात पुरविणे बंधनकारक राहील.

क) याकामी नियुक्त कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना वर्षातून किमान ०२ वेळा महानगरपालिकेच्या रुग्णालयातून आरोग्य तपासणी स्वखर्चाने करणे नियुक्त धार्मिक संस्थेवर बंधनकारक राहील.

ड) नियुक्त संस्थांनी कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना कामाचे वेतन व त्या अनुषंगिक इतर भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कामगारांच्या नांवे अंकाऊंट पे क्रॉस चेकने/इ.सी.एस./एन.इ.एफ.टी. व्दारे त्यांच्या बँक खात्यात जमा करून दरमहा प्रत्येक कामगारांस पेमेंट स्लीप देणे बंधनकारक राहील.

इ) कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार विमा/कामगार कल्याण निधी संबंधीत शासकीय कार्यालयाकडे जमा केलेबाबत पुरावे सादर करणे बंधनकारक राहील. भविष्य निर्वाह निधीबाबत कामगारांचे हजेरीपत्रक, वेतन रजिस्टर, ई.सी.आर. फॉर्म व चलन दरमहा सादर करणे बंधनकारक राहील.

फ) याकामी नियुक्त कामगारांना काम करताना स्वत:स/दुस-यास काही इजा, अपघात, जिवित/वित हानी झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी नियुक्त धार्मिक संस्थेची राहील. याची कोणतीही जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

ग) सदर कामावर बालमजूर ठेवता येणार नाही. तसेच याकामी नियुक्त कामगार कोणतेही अपंगत्व नसलेले, शारीरीक दृष्ट्या सक्षम असावेत. त्यांची वयोमर्यादा १८ ते ६० वर्ष दरम्यान असावी.

१२) राज्यशासन निर्णयानुसार किमान वेतन दरातील सर्व प्रकारचे वाढीव दर देय राहील.

१३) नियुक्त धार्मिक संस्थेस मुदतपुर्व काम बंद करावयाचे झाल्यास, त्याने किमान ९० दिवस लेखी पुर्वसुचना देणे बंधनकारक राहील.

१४) ज्यांचा अर्ज स्विकृत करणेत येईल, त्यांना स्वखर्चाने योग्य त्या स्टॅम्प पेपरवर महानगरपालिकेस करारनामा करुन द्यावा लागेल व याशिवाय र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर मा. नगरसदस्य अथवा त्यांचे नातेवाईक यांचेशी संबंधित नसल्याचे नोटराईज्ड हमीपत्र करुन द्यावे लागेल.

१५) कामाचा आदेश दिल्यानंतर त्वरीत काम चालू करणे बंधनकारक राहील. या कामाबाबत निविदा धारकाकडून अटी शर्तीचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास, करार रद्द करणेत येऊन ठेका संपुष्टात आणणेत येईल व अनामत रक्कम जप्त करणेत येईल. सदरचा ठेका अन्य कोणत्याही ठेकेदारास पोट ठेक्याने देता येणार नाही.

१६) कामाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा वाद विवाद निर्माण झाल्यास तो लवादाच्या तरतुदीनुसार सोडविणेत येईल. या कामी मा.आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांची लवाद म्हणून नेमणूक करणेत येईल. लवादाचा निर्णय अंतिम राहील व तो दोन्ही पक्षावर बंधनकारक राहील.

१७) दैनंदिन कामातील त्रुटींबाबत खालीलप्रमाणे दंड आकारणेत येईल.

| अ.क्र. | कामातील त्रुटीचा तपशिल | दंड र.रु. |
|---|---|---|
| १ | कामगार कमी पुरविलेस | प्रति कामगार ०१ दिवसाचे वेतन + र.रु. १००/- प्रति दिन |
| २ | कामकाज समाधानकारक न झाल्यास/तक्रार प्राप्त झाल्यास/दैनंदिन साफसफाई न केल्यास | प्रति दिन र.रु. ५००/- |
| ३ | गणवेश परिधान न केल्यास | प्रति कामगार प्रति दिन र.रु. ५०/- |
| ४ | ओळखपत्र न लावल्यास | प्रति कामगार प्रति दिन र.रु. २५/- |

१८) संस्थेमार्फत नियुक्त करणेत येणारे कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना महानगरपालिकेमध्ये नोकरीशी काहीही संबंध राहणार नाही व तसा कोणताही हक्क त्यांना सांगता येणार नाही.

१९) संस्थेकडील कंत्राटी सुरक्षा काळजीवाहकांना मनपा. कर्मचा-यांचे संप/हरताळ इत्यादीमध्ये भाग घेता येणार नाही.

२०) अटी युक्त अर्ज/प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. तसेच कोणत्याही निविदा स्विकारणे, रद्द करणे अथवा नाकारणेचा अधिकार आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका-४११ ०१८ यांनी राखून ठेवला आहे.

आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी- चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-४११ ०१८

वैद्यकीय मुख्य कार्यालय
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
जा.क्रं. वैद्य/७/कावि/१२०३/२०१९
दिनांक २८/०६/२०१९
जाहिरात क्र. 322

## जाहिर निवेदन क्रं. :- १/२०१९-२०

| अ.क्रं | दफनभूमीचा पत्ता | काळजीवाहक संख्या (८ तासांसाठी १ याप्रमाणे दररोज ३) |
|---|---|---|
| १ | मुस्लिम दफनभूमी, नेहरुनगर | ३ |
| २ | मुस्लिम दफनभूमी, दापोडी | ३ |
| ३ | मुस्लिम दफनभूमी, लिंकरोड चिंचवड | ३ |
| ४ | मुस्लिम दफनभूमी, कासारवाडी | ३ |
| ५ | मुस्लिम दफनभूमी, निगडी | ३ |
| ६ | मुस्लिम दफनभूमी, फुगेवाडी | ३ |
| ७ | मुस्लिम दफनभूमी, च-होली | ३ |
| ८ | मुस्लिम दफनभूमी, कुदळवाडी | ३ |
| ९ | लिंगायत दफनभूमी, मोरवाडी(जुनी व नविन एकत्रीतसाठी) | ३ |
| १० | ख्रिश्चन दफनभूमी, लिंकरोड चिंचवड | ३ |

आयुक्त
पिंपरी- चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८